# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 24/11/2022 (गुरूवार) दुपार

---

### घरफोडी

**१) पो.स्टे. अरोली** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावर मौजा अरोली वार्ड क्र ०३ येथे दिनांक २२/११/२०२२ चे १९.०० वा. ते ०५.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– विजय राजुजी हटवार, वय ३४ वर्ष, रा. चोखाळा यांचे नमुद घटनास्थळी बिल्डींग मटेरीयल सप्लायर ॲन्ड ट्रेडर्सचे दुकान असुन दुकानातील कोणीतरी अज्ञात चोराने नमुद घटनावेळी फिर्यादीचे बिल्डींग मटेरीयल सप्लायर ॲन्ड ट्रेडर्स दुकानातील लोखंडी शटर वाकवुन दुकानाचे आत शिरून दुकानातील काउंटरमधील ठेवलेले किमती अंदाजे एकुण १०,२४,०००/–रू. तसेच सतिश भाष्कर बावनकुळे, रा. अरोली यांचे हार्डवेअर दुकानाचे काउंटर मधील १५,०००/–रू. असा एकुण १०,३९,०००/रू. /–रुपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक राजेश जोशी पोलीस स्टेशन अरोली मो. नं. ७८७५९६६६७६ करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत २० कि. मी. अंतरावर महालगाव कामठी येथे दिनांक २२/११/२०२२ चे २१.०० वा. ते दिनांक २३/११/२०२२ चे ०६.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे– अमोल मोरेश्वर मुळे, वय ३२ वर्ष, रा. दुर्गा माता मंदीर, महालगाव याचे दुकानात नमुद घटनावेळी कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे दुकानामध्ये आत प्रवेश करून गल्ल्यातील किंमती १८,०००/–रू व एक जुना वापरता विवो कंपनीचा मोबाईल किंमती अंदाजे ३०००/– रू असा एकुण २१,०००/– रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार गौतम मेश्राम, ब. नं. १६९, मो. नं. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर